आयुर्वेदिक औषधी वनस्पती परिचय

(वैद्य श्रीनिवास जळुकर(१९३१) नाशिक आयुर्वेदिक महाविद्यालयात द्रव्यगुण विषयाचा अध्यापनाचा १० वर्षाचा अनुभव. शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय नागपूर, नांदेड आणि मुंबई पोद्दार आयुर्वेदिक महाविद्यालयात अधिष्ठाता म्हणनू काम. वनस्पती परिचय गुणधर्म शास्त्राशी संबंध मुंबई विद्यापीठ बहिःशाल विभागात काम. यांनी ' **आयुर्वेदिक औषधी वनस्पती परिचय** ' दिला आहे.)

शासनाच्या दर्शनिका विभागाकडून १९५३ साली श्री. एस.पी. अघारकर यांनी लिहिलेला (बॉटनी पार्ट वन) 'मेडिसिनल प्लॉन्टस्' हा ग्रंथ प्रकाशित झाला. त्यापूर्वी मुंबई विभागातील उपयुक्त वनस्पतींची शास्त्रीय माहिती संकलित करण्यास प्रारंभ झाला आणि ही माहिती मुंबई राज्य गॅझेटिअरद्वारे प्रसिध्द केली गेली. वनस्पती शास्त्रातील, शेतकी शास्त्रातील, वनसंरक्षण आणि औषधी (वैद्यक) शास्त्रातील तज्ज्ञ आणि त्यांची प्रसिध्द झालेली विविध पुस्तके किंवा ग्रंथ यांचा आधार घेऊन हा ग्रंथ प्रसिध्द झाला होता. मूळ ग्रंथ इंग्रजी भाषेत प्रसिध्द झाला. आज नव्या शतकातच नव्हे तर सहस्त्राकात त्या ग्रंथाची मराठी सुधारित आवृत्ती पुस्तकरूपाने महाराष्ट्र शासनाचे दर्शनिका विभागातर्फे प्रसिध्द केली जात आहे ही आनंदाची बाब आहे. मराठी भाषा जाणणाऱ्या सामान्य जनतेला ही माहिती समजेल तसेच वनस्पतिशास्त्राचे अभ्यासक, शेतीशास्त्राचे अभ्यासक, सामान्य पण जिज्ञासू शेतकरी, वैद्यकीय व्यवसाय करणारे आयुर्वेदीय वैद्य आणि वानस्पतिक औषधांचा (Herbel Medicine) आपल्या व्यवसायात उपयोग करण्याची इच्छा असणारे अनेक आधुनिक वैद्य, तज्ज्ञ डॉक्टर, व्यापारी, औषधे तयार करणारे कारखाने आणि आयुर्वेदीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनासुध्दा त्याचा लाभ मिळेल.

वनस्पतींचा संबंध मानवी आणि प्राणी जीवनाशी अत्यंत निगडित आहे. विशेषतः अन्न, औषधे, वस्त्र, निवारा, फर्निचर तसेच पूरक ज्वलनासाठीही वनस्पतींचा (लाकूड, कोळसारूपाने) उपयोग होतो. म्हणून आपल्या जीवनव्याची वनस्पतींची ओळख व त्यांचा उपयोग महाराष्ट्रातील जनतेला मराठी भाषेच्या माध्यमातून होणे आवश्यक आहे.

अन्न आणि औषधांचा प्रश्न समोर आला म्हणजे आयुर्वेदाकडे सर्वांचे लक्ष जाणे स्वाभाविक आहे. प्रस्तुत वनस्पतिशास्त्राच्या पूर्व प्रकाशित इंग्रजी आणि या मराठी पुस्तकात वनस्पतींची ओळख,गुणधर्म, स्वभाव आणि उपयोग दिलेले आहेत. त्यात पहिला आणि महत्वाचा भाग म्हणजे औषधी वनस्पती हा आहे. औषध याचा अर्थ आपणास समजत असला तरी त्याची निश्चित व्याख्या ठरविणे कठीण आहे. औषधाबद्दलच्या शास्त्रीय व्याख्येत न जाता सगळयांना समजेल अशी छोटी आणि सुटसुटीत व्याख्या विचारासाठी घेतली आहे ती अशी 'वैद्यो व्याधिः हरेत येन तत्द्रव्यं प्रोक्तमौषधम्, ' वैद्य किंवा डॉक्टर ज्या पदार्थाच्या उपयोगाने रोग बरा करतात त्या पदार्थाला औषध म्हणावे. या व्याख्येप्रमाणे खाण्यापिण्यातील अन्न म्हणजे आहार द्रव्ये किंवा साधे वा गरम पाणी हे सुध्दा औषध म्हणता येईल. रोग्याला अपचन झाले आणि डॉक्टरांनी लंघन करा असे सांगितले तर लंघन हे औषध म्हणविले जाते. 'लंघनं परमौषैधम् ' वरील दृष्टिकोनातून लंघनापासून तर पाणी आणि आहार द्रव्यातील वरण, भात, भाजी,

मसाल्यातील द्रव्ये, तीव्र शक्तीच्या वनस्पती आणि विविध खनिज क्षार किंवा धातुभस्मांचे उपयोगाने तयार केलेली अद्यावत सर्व द्रव्ये औषधांमध्ये समाविष्ट होऊ शकतात.

'औषधं जाहूनवी तोयं । वैद्यो नारायणो हरिः ।। ' गंगेचे शुध्द पाणी त्र औषध, आणि नारायण (देव) हाच वैद्य. प्रस्तुत ग्रंथात वेळोवेळी आढळून आलेल्या वनस्पती आणि खेडयापाडयांतून केले जाणारे त्यांचे प्रयोग (उपचार), वनस्पतींचे अभ्यासातून ज्ञात झालेले रासायनिक घटक, त्यात दिसून आलेली जीवनसत्वे (व्हिटॅमिन्स्), यूनानी ग्रंथांतून वाचनात आलेले औषधी उपयोगही या ग्रंथात समाविष्ट केले असून ग्रंथ अद्ययावत करण्याचा प्रयत्न केलेला आहे. काही वनस्पतींच्या नावांमध्ये कुल, स्थानिक भाषांतील उच्चारांतील फरक आणि काही ठिकाणी तज्ज्ञांचे विचारातील मतभेद यामुळे थोडा फरक जाणवण्याची शक्यता आहे.

पार्श्वभूमि :– आयुर्वेदशास्त्र नेमके केव्हा प्रचारात आले याची माहिती सांगणे अत्यंत कठीण आहे. बालकाच्या जन्मापूर्वी आईचे स्तनात बालकाच्या पोषणासाठी दुधाची निर्मिती झालेली असते, तसेच मनुष्यप्राण्याचे निर्मितीपूर्वी त्यांना लागणाऱ्या आहार आणि औषधांची निर्मिती आणि उपयोगाचे शास्त्र तयार झाले ते ब्रम्हदेवाने प्रजा निर्माण केली त्यापूर्वीच आयुर्वेदाचे स्मरण केले. त्याने आयुर्वेद स्मरणाप्रमाणे आठवला तसा प्रजापतीला सांगितला. प्रजापतीपासून पुढे अश्विनीकुमार, इंद्र, धन्वंतरी व पुढे आत्रेयादि ऋषिमुनींकडे ती परंपरा चालत आली. आज उपलब्ध असलेले 'चरकसंहिता', 'सुश्रुतसंहिता', 'अष्टांगसंग्रह' आणि 'काश्यपसंहिता' हे संहिताग्रंथ इ. स. पूर्वीचे, असावेत. मध्य काळात 'अष्टांगहृदय', 'भावप्रकाश', 'योगरत्नाकर' आदि ग्रंथ तयार झाले, त्यामानाने नंतर 'शारङ्गधर', 'रसरत्न समुच्चय', 'निघंटरत्नाकर' इत्यादि ग्रंथ तयार झाले आहेत.

आयुर्वेदीय सर्व ग्रंथातून आहार द्रव्यांचे आणि औषधी द्रव्यांचे गुण विस्ताराने व्यक्त झाले आहेत. वनस्पती द्रव्यांचे गुणधर्म व उपयोग वर्णन केलेल्या विशेष ग्रंथांना निघंटु असे म्हणतात. निघस् (निधः) अन्न, भोजन, घटन जुळवणे, गोळा करणे म्हणजे अन्न द्रव्यांचे गुणधर्म ' जुळवणे–एकत्र करणे. या क्रियेचा विस्तार वनस्पती द्रव्यांचे गुणधर्म, ' उपयोग एकत्र संकलित केलेला ग्रंथ म्हणजे निघंटु होय. अनेक निघंटूंचा उल्लेख आयुर्वेदीय ग्रंथ संपत्तीत आहे. तथापि उपलब्ध असलेल्या निघंटूमध्ये 'भावप्रकाश निघंटु', 'केयदेव निघंटु', 'मदनपाल निघंटु', 'गुड्च्यादि निघंटु', 'धन्वंतरी निघंटु', 'राज निघंटु', 'शालिग्राम निघंटु', 'निघंटरत्नाकर' इत्यादी अनेक ग्रंथ प्रसिध्द आहेत. कित्येक निघंटुंची नावेच उपलब्ध असून ग्रंथ मात्र उपलब्ध नाहीत. वनस्पतिशास्त्रात वृक्ष, वेली, क्षुप इ. प्रकाराने केलेल्या वर्गीकरणाप्रमाणेच किंचित भिन्नप्रकारे वर्गीकरण आयुर्वेदात केले आहे.

१. **वनस्पति** – हा शब्द सामान्य अर्थाने लहानात लहान वनस्पतींपासून मोठमोठया वृक्षांपर्यंत सर्वांना वापरला जातो, पण आयुर्वेद ग्रंथात त्याची व्याख्या – पुष्परहितोफलद्रुम : (अपुष्पा फलवंत्या वनस्पतयः) अशी केली आहे. अपुष्प किंवा पुष्परहित याचा अर्थ ज्यांची फुले स्पष्ट दिसत नाहीत आणि फळे मात्र दिसतात अशा वनस्पती . उदा. वड, उंबर, पिंपळ, पिंपरी असे वृक्ष.

२. **वानस्पत्य** – (पुष्पैः फलैः युक्ता वनस्पतयः) पुष्प फलवान् वृक्षः = ज्यांची फुले स्पष्ट येऊन फळे दिसतात त्या वनस्पति. उदा. आंबा, शेवगा, संत्री, मोसंबी इ.

३. **वीरुध्** – (प्रतानयुक्तौभ्दिद विशेषः लतागुल्मादिः) – ताण्यांनी पसरणाऱ्या वेली आणि झुडुपे, पसरणारी जाळीसारखी झाडे. उदा.

गिलकी, दोडकी, दुधी, करवंद, तुळस इ.

४. **औषधि** – (औषध्यः फल पाकान्ताः) फलपाकनिष्ठा औषधयः – फळे किंवा बी आल्यानंतर ज्या पक्व होतात व नष्ट होतात त्या वनस्पती. उदा. गहु, ज्वारी, डाळी, भुईमूग इ. औषधि या शब्दाची औषध शब्दाबरोबर गल्लत करू नये (औषधी म्हणजे औषध नव्हे).

वनस्पतींची ओळख

आधुनिक वनस्पतिशास्त्रात वनस्पती ओळखण्याची एक शास्त्रीय पध्दत रुढ झाली आहे. वनस्पतिंची पाने, फांद्या, वृक्षगुल्म, क्षुप इ. पेक्षाही फुलांचे परिक्षणावरुन वनस्पतीचा वर्ग ठरविला जातो आणि त्या वर्गातील विशिष्ट जातीवरुन वनस्पतिचे नाव निश्चित केले जाते. वनस्पतिंची निरनिराळया भाषेतील नावे किंवा प्रचारात असलेली ग्राम्यनावे यामुळे वनस्पतिची ओळख पटण्यास किंवा वनस्पतिंचे ज्ञान होण्यास येणारी अडचण शास्त्रीय चर्चेत उत्पन्न होत नाही. पूर्वीचे काळी वनस्पतिंची ओळख अनेक संस्कृत पर्यायी शब्दांचा वापर करून पटविली जाई. उदा. अपामार्ग म्हणजे आघाडा या मराठी नावाने प्रसिध्द असलेली वनस्पती, संस्कृतमध्ये अपामार्ग म्हणजे अपामार्जन करण्यासाठी वापरली जात असे. अपामार्जन – सफाई, स्वच्छता. या स्वच्छतेत दात स्वच्छ करणे, स्नानासाठी (ऋषिपंचमी व्रतसंदर्भ शरीर बाहयशुध्दीसाठी) वापरतात. अंत–शुध्दीसाठी म्हणजे वमनविरेचन आणि मूत्र प्रवृत्ती चांगली करणे, तसेच व्रण स्वच्छ करून भरून आणण्यास सुध्दा या वनस्पतिचा उपयोग होतो. या वनस्पतीला विशिष्ट प्रकारचा तुरा येतो. म्हणून याला 'शिखरी ' (शेंडी), 'मयुरी ' (मोराचे) तुऱ्याप्रमाणे तुरा दिसणारी अशी नोंद आहे. तुरा असलेल्या अनेक वनस्पतिंमधून याचे वेगळेपण स्पष्ट करण्यासाठी 'खरमंजिरी ' म्हणजे याचा तुरा खरखरीत असलेली, 'अधःशल्या ' याचे बी टोकदार असून शरीरास इजा करू शकते. वनस्पतिचे शेंडयाकडून मुळाकडे हात फिरविला तर बी टोचत नाही आणि खालून वर शेंडयाकडे हात फिरविला तर हाताला बी टोचते, हातात घुसून त्रास वाटू शकतो. म्हणून 'अद्यःशल्या ' हा पर्याय, आघाडा ओळखण्याची खूण आहे. याशिवाय लोमशपत्रा म्हणजे पानांवर बारीक लव असणे, अल्पपत्रिका–पाने लहान व कमी असणे, रक्तबिंदुकः म्हणजे पानांवर कुठे कुठे लालसर ठिपके दिसणे इ. १०:१२ पर्याय आहेत. अशा रीतीने एक वनस्पती ओळखण्यासाठी अनेक सार्थ पर्यायी नावे देण्याची प्रथा होती आणि गुणधर्माचे वा उपयोगविषयक श्लोक, वृत्तबध्द किंवा छंदोबध्द पाठांतरासाठी सोपे करण्यासाठीही हे पर्याय उपयुक्त होत.

श्री समर्थ रामदास स्वामी आपल्या दासबोध ग्रंथात लिहितात :–

वाट पुसल्यावीण जाऊ नये । फळ ओळखल्यावीण खाऊ नये ।।

पडली वस्तु घेऊ नये । एकाएकी ।।

आयुर्वेदात म्हटले आहे की, औषधे तज्ज्ञाचे सल्ल्याने, मार्गदर्शनाने वापरली तर अमृताचे कल्प ठरतात, पण अज्ञानाने किंवा अनभिज्ञ व्यक्तीच्या सल्ल्याने वापरली तर ती शस्त्राप्रमाणे व्रण निर्माण करून, विजेप्रमाणे जाळून किंवा विषाप्रमाणे शरीरात रक्तात जाऊन प्राणनाशक ठरु शकतात. **'औषधी गुणधर्माची पुस्तके, ही, वाचून उपचार घेण्यासाठी नसून उपचारांची दिशा दाखवणारी असतात. '**

वनस्पती, आहार, औषध आहे आणि विषही आहे. आहार द्रव्ये शरीरावर कार्य करीत असली तरी ती औषधी द्रव्यांचे मानाने सौम्य असतात.

औषधे ही आहार द्रव्यांपेक्षा जास्त शक्तीची आणि लवकर परिणाम करणारी असतात. म्हणून विषातील शरीराला बाधक असलेले गुणधर्म नष्ट व्हावे या हेतूने विषद्रव्ये शुध्द करून वापरली जातात. दूध, तूप, गोमूत्र किंवा अन्य द्रव्यांचा संस्कार, अग्निसंस्कार यामुळे विषातील मारक बाधक गुण कमी होतात व शरीरसात्म्यता येऊन विष किंवा विषमिश्रित द्रव्ये त्वरित परिणामकारी होतात.

आयुर्वेद अथर्ववेदाचे उपांग किंवा पाचवा वेद म्हटला जातो. अथर्ववेदातच नव्हे तर ऋग्वेद, यजुर्वेद, पुराणे, उपनिषदे यातूनही वैद्यकविद्या आहे. विविध वनस्पती आणि रोगांची नावे उपचारांचा उल्लेख त्यातून आला आहे. अश्वगंधा वनस्पतिस अश्मगंधा उल्लेखिलेले जाणवते. वेखंड या द्रव्याचा मणि (जागिडमणि) रोगजंतूपासून शरीररक्षणासाठी शरीरावर धारण करावा असे वचन आढळते. काही ठिकाणी गुणधर्माचा उपयोग मनावर चांगला ठसावा म्हणून ' अतिशयोक्ति ' अलंकाराचा उपयोग केला असावा असे दिसते. वेखंडापुढे कोणताही जीवजंतु टिकू शकणार नाही. रसायन वाजीकर द्रव्यांचे गुणधर्म वर्णन करताना ही अतिशयोक्ती स्पष्ट जाणवते. तेव्हा अशा विधानांचा मर्यादित अर्थ घेणे योग्य होय.

वनस्पतींचे मानव आणि प्राणी यांचे जीवनाशी असलेल्या संबंधामुळे वृक्षांना देवत्व दिले. व्रतवैकल्यात पूजा करताना वनस्पती परिचयाचा संबंध भारतीय जीवनाशी निगडित ठेवण्यात आला. महाराष्ट्रात प्रसिध्द असलेल्या गणेशोत्सवाकडे पहा. घराघरातून आणि सार्वजनिक ठिकाणी गणेश पूजनात गणपतीला पत्री वाहिली जाते त्यावेळी पूजनात म्हणतात – श्री लंबोदरायनमः बदरीपत्रम्– यामध्ये बोरीची पाने तुरट, रूक्ष आणि अंतःर्बाह्य उपयोगाने मेदोघ्न आहेत. (परिणामी पोटावरचा मेद कमी झाल्याने लंबोदरत्व कमी होण्यास उपयोगी आहेत). श्री गजकर्णायनमः – तुलसीपत्रम्. तुळस ही सुगंधी, कफनाशक वनस्पती असून त्वचेचे विशेषतः गजकर्ण विकारात चोळली म्हणजे खाज कमी होते आणि गजकर्ण कमी होण्यास मदत होते, श्री. सुमुखायनमः मालतीपत्रम् – मालती म्हणजे जाई किंवा चमेली. या सुगंधी वनस्पतीची पाने चावूनचावून तोंडात फिरविली, जाईचा रस तोंडात लागला म्हणजे तोंडातील व्रण बरे होतात. जात्यादी तेलसुद्धा व्रण बरे करण्यास प्राधान्याने वापरले जाते. शंकराला बेल, मारूतीला रूईचे पानांची माळ, शनीला तेल, बाळकृष्ण किंवा विष्णुला तुळस, गणपतीला दूर्वा वाहणे हेही असेच लाक्षणिक आहे. हळद, पारिजातक, कणेर, चंपक (चाफा), कोरांटी इ. सर्व पूजेत आहेत. या सर्व गोष्टींवरून वनस्पती ज्ञान व त्यांच्या उपयोगाचे मार्गदर्शन धर्मशास्त्रातून मिळते, अगदी अलीकडील उदाहरण द्यायचे तर संतशिरोमणी तुकाराम महाराज म्हणतात, 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे ' एवढा एक चरणही वृक्षवल्लींचे महत्व सांगण्यास पुरेसा आहे.

आयुर्वेदीय संहिता ग्रंथातील वनस्पतींचे गुणधर्म पूर्वाचार्यांनी कसे शोधून काढले हे खरोखर कुतुहलच आहे. तथापि प्राचीन ग्रंथकारांनी याविषयी काही महत्वपूर्ण नोंदी केल्या आहेत.

संहिता ग्रंथ रचणाऱ्या ग्रंथकारांनी प्रत्येक ज्ञात अज्ञात (माहित असलेल्या माहित नसलेल्या) वनस्पती तथा अन्य औषधाचे गुणधर्म कसे ठरवावे त्याचे वर्णन प्रायः सर्व ग्रंथात आहे. विशेषकरून चरक संहिता सूत्रस्थान अध्याय २६ व २७, सुश्रुत संहिता सूत्रस्थान ४६ व अष्टांगसंग्रह सूत्रस्थान अध्याय ७ मध्ये विस्ताराने वर्णन केले आहे. त्याचप्रमाणे चरक कल्पस्थानांत हया द्रव्यांपासून औषधे तयार करण्याचे विधी व सिध्दान्त सांगितले आहेत. त्याचप्रमाणे धन्वंतरी निघण्टुमध्ये अशा द्रव्याचे गुणधर्म प्रयोगाने सुध्दा ठरवावे असे सूचविले आहे.

'ते भ्यः सकाशात् उपलभ्य वैद्य प्रश्नात शास्त्रेषु विमृश्य बुद्ध या

विकल्पयेद् द्रव्यरस प्रभावात् विपाकविर्याणी तथा प्रयोगात ' (धन्वंतरीनिघण्टु श्लोक क्र. ७)

अष्टांग संग्रहकारांनी त्याच्याही पुढे जाऊन अशा सूचना दिल्या आहेत की, बुध्दिमान वैद्याने केवळ ग्रंथात गुणधर्म सांगितलेल्या औषधीच्याच वापरावर अवलंबून न राहता आम्ही दाखविलेल्या दिशेने (पध्दतीने) शास्त्रातील सिध्दान्ताकडे दुर्लक्ष करता स्वतःच्या बुध्दीने नव्या व जुन्या औषधाच्या गुणधर्म युक्तिने प्रयोगाने ठरवावे व वापरावे. संदर्भ –

'दिशयानया शेषमपि स्वयमूहेत बुध्दिमान् न शास्त्रमात्रशरणो न चानालोचितागमः ' (अ.सं. सू. ७/२६१)

इतिहासशास्त्र आणि अन्य परीक्षकांचे आधारे असे म्हणता येईल की, पशु, पक्षी व प्राणी हे कोणत्या वनस्पतींचा उपयोग खाण्यासाठी करतात? त्याचा त्यांचे शरीरावर काय परिणाम झाला ? याचे सूक्ष्मावलोकन पूर्वाचार्याचे असावे. तसेच ग्रंथात वनस्पतींचे सामान्य गुणधर्म ठरविण्यास त्याचा 'रस ' कोणता आहे ? म्हणजे वनस्पती गोड, आंबट, खारट, तुरट, तिखट किंवा कडू आहे का ? हे जाणून त्याचे रसात्मक परिणाम सांगता येतात. रसाप्रमाणेच परिणाम करणारा एक विशेष स्वभाव वनस्पतिंमध्ये असतो त्यास 'वीर्य' (म्हणजे द्रव्यशक्ति) म्हणतात. ही शक्ति साधारणतः गरम (उष्ण) आणि थंड (शीत) परिणामात वर्णन केलेली असते. तिसरा कार्यकारी गुण म्हणजे पचनानंतर जाणवणारा विशेष परिणाम. यास 'वपाक' असे नाव दिले असून हा परिणाम गोड, आंबट किंवा तिखट या तीन रसांप्रमाणे असतो. शेवटचा कार्यकारी गुण म्हणजे 'प्रभाव'. हा गुण विशेष प्रकारचे कार्य दाखवतो आणि ते कार्य वर सूचित केल्याप्रमाणे म्हणजे 'रस, वीर्य, विपाक' यांचे नियमाप्रमाणे नसते किंवा सामान्य नियमांप्रमाणे त्या विशिष्ट कार्याचे स्पष्टीकरण करता येत नाही.

औषधी विद्याषड्विद्या

मध्यकाळात वनस्पती उपयोगाबरोबर पारदभस्म व धातुभस्मे व त्यापासून निर्माण होणारी औषधे उपयोगात आली. त्या सुमारास नागार्जून नावाचे शास्त्रज्ञाने 'उपायहृदय' नावाचा ग्रंथ लिहिला. त्या ग्रंथात नागार्जुनाने म्हटले आहे की, औषधी विद्याषड्विद्या – औषधी विद्या सहा प्रकारची आहे. (१) औषधीनाम, (२) औशधीगुणाः, (३) औषधीरसः, (४) औषधी वीर्यम्, (५) सांन्निपातो व (६) औषधि धर्माः ।

एक वनस्पती अनेक विकारांवर उपयोगी पडते. उदा. हरीतकी सुमारे वीस विकारात उपयोगी पडते. वनस्पतीचे दोषांवरील कार्य सामान्यतः स्थिर स्वरूपाचे असते, पण अनुपानात बदल करून त्याच वनस्पतीचा उपयोग काहीसा बदलून वेगळा करता येतो. हरीतकी – हिरडा या वनस्पतीचे गुणधर्म सांगताना – लवणेन स कफं हन्ति । पित्तं हन्ति स शर्करा । घृतेन वातजान् रोगान् । म्हणजे कफरोगात हरीतकी चूर्ण मिठाबरोबर वापरावे. पित्तरोगात साखरेबरोबर वापरावे आणि वातरोगात तुपाबरोबर वापरावे असे सांगितले आहे. अन्य द्रव्ये वापरतांना ती तज्ज्ञाचे सल्ल्याने वापरणे चांगले.

परिभाषा : प्रत्येक शास्त्राला परिभाषा असते. शब्दाच्या सरळ अर्थाचा विचार अशा वेळी करू नये किंवा तज्ज्ञास विचारणे चांगले. उदा. श्वदंष्ट्रा या शब्दाचा अर्थ कुत्र्याचा दांत होईल. अतिविष याचा अर्थ फार किंवा जहाल विष असा होईल पण या दोन वनस्पतींचा अर्थ अनुक्रमे गोखरू आणि लहान मुलांना उपयोगी पडणारे विषाची भयंकर लक्षणे अजिबात नसलेले अतीतकळी नावाचे औषध असा आहे. याखेरीज एखाद्या ज्वरासारख्या

विकारात किंवा त्वचेच्या विकारात निंब (कडुलिंब) वापरा असे सांगितले किंवा मोठया वृक्षाचा वापर एखाद्या विकारात सांगितला असेल तर मोठया वृक्षांच्या फांद्यांचा साल किंवा अंतर्सालीचा उपयोग करावा. क्षुपांचे प्रायः पंचांग (सर्वक्षुप) वापरावे म्हणजे पाने, फळे, फुले, कंद आणि मूळही वापरावी. वेलींची पाने किंवा फळे वापरावी. एकाच वनस्पतीची विविध अंगे पचनाचे दृष्टीने कमी–जास्त जड असतात. पानांपेक्षा फुले, नाल (दांडया किंवा शाखा), कंद, मूळ ही क्रमशः जड असतात.

औषध केव्हा घ्यावे हे सांगितले नसेल तर सकाळी घ्यावे. औषधी वनस्पतीचे चूर्ण, गोळया किंवा ओली वनस्पती वाटून तयार झालेला चटणीसारखा पदार्थ कल्क औषध कसा घ्यावयाचा उल्लेख नसेल तर स्वच्छ चांगल्या भांडयातील साध्या पाण्याबरोबर औषध घ्यावे. मुद्दाम थंड किंवा गरम करण्याची आवश्यकता अशा वेळी नसते. वनस्पतीचा रस उपलब्ध नसेल तेव्हा काढा वापरावा.

सामान्य औषधांची मात्रा, प्रमाण लिहिले नसेल तेथे १ ते ५ ग्रॅम चूर्ण वापरतात, रस १ ते २ चमचे वापरतात. कल्क २ ते १० ग्रॅम वापरता येतो. शुष्कद्रव्यांची १० ग्रॅम मात्रा १६ पट पाण्यात घालून मंदाग्नीवर (१/८) काढा करून १:२:३ वेळा विभागून देतात.

वनस्पतीचे समान अंग मानवाच्या तत् समान अंगावर कार्य करते. उदा. वनस्पतीची त्वचा (साल) माणसाचे त्वचेवर आणि रस धातूवर कार्य करते. मूळ मेंदू आणि नाडिसंस्थेवर कार्य करते, फुले, फळे शुक्रार्तवावर कार्य करतात. फळांचा गर, पानांचा कल्क मांस भेददावर कार्य अधिक दाखवतो इ. भागही विचारात घ्यावा. यास अपवाद असतात औषधोपचाराचे १० काळही सांगितले आहे. शरीरातील वायूचे विकृतीचा विचार करून कोणत्या काळात औषध द्यावे असेही सूक्ष्म विचार आयुर्वेदात आहे. अर्थात असे सर्व विचार वैद्यकशास्त्राचा भाग आहे. वनस्पती माहितीच्या या पुस्तकांतून असा सर्व विचार मांडणे व तो सर्वांना समजणे प्रत्यक्ष वैद्यकीय ज्ञानाशिवाय शक्य नाही याची जाणीव ठेवून ग्रंथ विस्तार मर्यादित केला आहे.

आयुर्वेदविकास

आयुर्वेदचिकित्सा म्हणजे, काही वनस्पतींचे चूर्ण, काढे आणि गोळया मधाबरोबर, तुपातून, दूधातून किंवा पाण्याबरोबर सेवन करणे, अशी सामान्यपणे धारणा आहे. वस्तुस्थिती मात्र तशी नाही. ब्रम्हदेवाने सांगितलेला आयुर्वेद ऋषीमुनींकडे आला त्यात दोन मुख्य भाग होते. पहिला भाग कायचिकित्सा , याची परंपरा आत्रेय भारद्वाजांचेद्वारा चरकादींकडे आली आणि भगवान धन्वंतरीकडून ती सुश्रुतादींकडे आली ती शल्यचिकित्सा हा दुसरा भाग. आयुर्वेदाचे पोषण आठ अंगांनी झालेले दिसून येते. ती आठ अंगे पुढीलप्रमाणे :–

१) **कायचिकित्सा** : म्हणजे सामान्य शारीरिक रोग व त्यांची चिकित्सा (उदा. ताप, खोकला, जुलाब) या चिकित्सेत अनेक ग्रंथ आणि प्रथितयश वैद्य वर्ग होऊन गेले. आजही कार्यचिकित्सक उपलब्ध आहेत. जैन संप्रदायात श्री. दशरथगुरू यांनी त्यावर आपला अधिकार प्रस्थापित केलेला होता.

२) **बालचिकित्सा** : लहान मुलांची चिकित्सा. यास कौमारभृत्य असेही म्हणतात. बालकजन्म म्हणजे प्रसुति. बालजन्म म्हणजे गर्भाशयात गर्भ निर्माण होणे. हा संदर्भ धरून स्त्रियांचे विकार, प्रसूति आणि बालजन्मापासून सामान्यतः मुले सोळा वर्षांची होईपर्यंतची चिकित्सा यात समाविष्ट

केलेली आहे. संहिता ग्रंथातील 'काश्यप ' मुनि आणि जैन सांप्रदायात 'मेघनाद ' यांचा उल्लेख यासाठी खास केला जातो.

३) **ग्रहचिकित्सा** : मानवी शक्तीपेक्षा व ज्ञात सामान्य लक्षणांपेक्षा अधिक किंवा निराळे विचित्र कार्य ही लक्षणे काही विकारात दिसतात. हे विकार म्हणजे ग्रहपीडा मानलेले असून यात अनेक मानस रोगांची निदान चिकित्सा समाविष्ट आहे.

४) **ऊर्ध्वाण्ग चिकित्सा :** यात कान, नाक, डोळे, तोंडातील भाग, दांत व घशापर्यंतचे विकार आणि शिरोविकारांचे निदान आणि चिकित्सा सांगितली आहे. यालाच शालाक्यचिकित्साही म्हणतात. शलाका म्हणजे सळई. सळईसारखी यंत्रे व शस्त्रे यांचा वापर चिकित्सेसाठी शालाक्य तंत्रात करतात.

५) **शल्यचिकित्सा** : यामध्ये शस्त्रकर्माने बरे होऊ शकणारे विकार आणि त्यांची शस्त्रकर्मचिकित्सा थोडक्यात सांगितली आहे. आयुर्वेदातील शस्त्रकर्माची तत्वे आजच्या शस्त्रकर्मचिकित्सेशी चांगलीच जुळणारी आहेत. आधुनिक बऱ्याच शस्त्रकर्मांचे मूळ यात सापडते. जैन आणि बौध्द संप्रदायाचे काळात शल्य, शालाक्य हे चिकित्सा भाग थोडे दुर्लक्षिले गेले, तरी जैन संप्रदायातील पात्रास्वामी यांनी शल्यतंत्रज्ञ म्हणून नाव मिळविले होते. पूज्यपाद हे शालाक्य तंत्रज्ञ होते.

६) **दंष्ट्राचिकित्सा** : दंष्ट्रा म्हणजे दांत, दातांचे दंशामुळे होणारे विकार. विविध प्राण्यांच्या दंशज विषाची चिकित्सा यात सांगितली आहे. सर्प, विंचू, कुत्रा, उंदीर इत्यादी प्राणिदंश याची लक्षणे व अन्य वनस्पतींची विष लक्षणे व विषनाशक औषधी चिकित्सा दंष्ट्राचिकित्सा म्हणून वर्णन केली आहे. विषद्रव्ये ही प्राणनाशक असल्याने त्याबाबतचा खुलासा केलेला आहे. त्यांची शुध्दी सामान्य लक्षणे सुचविली आहेत. विषद्रव्यांची मात्रा शुध्द केल्यानंतर ५० मिलीग्रॅम पासून २५० मि. ग्रॅमपर्यंत असते. अशुध्द विषयापेक्षाही कमी मात्रेत बाधक होऊ शकते. याचा मारक भाव विचारात घेऊन मात्रादींचा उपयोग प्रत्यक्ष विषद्रव्याचे गुणधर्मात टाळण्याचा प्रयत्न केला आहे. विषांचा उपयोग तज्ञांचे सल्ल्याशिवाय मुळीच करु नये. विषाची चिकित्सासुध्दा प्रथमोपचार म्हणून करावी पण शक्यतो रूग्णास रूग्णालयात नेऊन तज्ज्ञांकडून उपचार करून घ्यावे.

७) **जराचिकित्सा** : जरा म्हणजे म्हातारपण. म्हातारपण अकाली येऊ नये व स्वाभाविक म्हातारपणात होणारे अनेक त्रास होऊ नयेत. थोडक्यात वृध्दापकाळ सुखी होण्यासाठी तरूण, प्रौढ वयात घेण्याचीही चिकित्सा आहे. या चिकित्सेला रसायनचिकित्सा असेही म्हणतात.

८) **वृष (वाजीकरण) चिकित्सा** : संसारात गृहस्थाश्रम हा एक श्रेष्ठ आश्रम असून स्त्री–पुरुषांना समागमाचा आनंद आणि प्रजोत्पादनाचे कार्य यात प्रामुख्याने घडते. यासाठी स्त्री–पुरुष सक्षम व्हावेत व दोन्ही कार्यातील दोष दूर व्हावेत म्हणून औषधोपचारांचे मार्गदर्शन त्यात आहे. समाजातील लैंगिक गुन्हे मर्यादित करण्यास 'अवजीकर ' वाजीकरणविरुध्द चिकित्सा कदाचित मदत करू शकेल हा विचार सुचवून ठेवीत आहे. मुंबई शासनाद्वारे प्रसिध्द केलेल्या या मेडिसिनल प्लॅन्टस (१९५३) मध्ये वनस्पतीमध्ये आढळून आलेल्या जीवनसत्वांचे मुद्दाम सप्रमाण

वर्गीकरण चौथ्या भागात केले आहे. स्कर्व्ही सारख्या विकारात आयुर्वेदीय चिकित्सकांनी अडुळशाचा केलेला यशस्वी वापर पाहून अलीकडे अडुळशामध्ये स्कर्व्हीवर उपयोगी 'क' [C] जीवनसत्त्व असल्याचे ज्ञात झाले. आवळयातही 'क' जीवनसत्त्व भरपूर असल्याचे पूर्वीच ज्ञात झाले आहे. या वनस्पतीतील जीवनसत्त्वाबाबत महत्वाची गोष्ट म्हणजे ही जीवनसत्त्वे नैसर्गिक आहेत. वनस्पतीमध्ये गुणधर्माबरोबरच जीवनसत्त्वाचे अस्तित्व

असल्यामुळे तिच्या उपयोगात वैशिष्टय आले आहे. वासा (अडुळसा) आणि आवळ्यातील 'क' जीवनसत्त्वाबद्दल बोलावयाचे झाल्यास उष्णतेने नाश पावण्याचा, 'क' जीवनसत्वाचा सामान्य स्वभाव अडुळसा आणि आवळयातील 'क' जीवनसत्त्वात नाही. उलटपक्षी आवळयाचे बरेच कल्प आवळा वाफवून केले जातात व अडुळशांचा रस किंवा बरेच कल्प अडुळसा वाफवून तयार केले जातात. तरी त्यातील 'क' जीवनसत्त्व नष्ट किंवा हीन वीर्य होत नाही. आवळा व अडुळसा या वनस्पतीतील 'क' जीवनसत्त्व हा विशेष गुण आहे.

आयुर्वेदाचा विस्तार

आयुर्वेदाची आठ अंगे वर सांगितली आहेत. त्याखेरीज आयुर्वेदाचा उपयोग अन्यत्र म्हणजे पशुचिकित्सेसाठीही झालेला आहे. हस्त्यायुर्वेद हा हत्तींचे विकारांसाठी, अश्वायुर्वेद घोड्यांचे रोग आणि त्यांची चिकित्सा यासाठी पालकाप्यसंहिता, लिहिली गेली आहे. श्री. महर्षी सुश्रुतांबद्दल बोलताना इतिहासातील संदर्भात म्हटले आहे की –

'नराश्वगवायुर्वेद – जिज्ञासया पृच्छते सुश्रुताय ।' मनुष्य, घोडे, गाई, बैल यांचेबद्दल आयुर्वेदचिकित्सेविषयी ज्ञान ग्रहण करण्याचे उद्देशाने सुश्रुतास विचारते झाले – यावरून सुश्रुतमहर्षी केवळ मनुष्यांचे औषधोपचार किंवा शस्त्राकर्मादीमध्ये तज्ज्ञ नव्हते तर मनुष्याबरोबरच पशु रोग–निदान चिकित्सेतही ते तज्ज्ञ होते हे स्पष्ट होते. सुश्रुताला आणखी दोन विशेषणे लावलेली दिसतात. ती अशी 'भेषज कुशलः ' आणि दुसरे 'मैत्रचित्त' म्हणजे औषधोपचारात तज्ज्ञ आणि मैत्रीपूर्ण स्वभाव एकूण आयुर्वेदात सुश्रुत हा तत्कालीन सर्वश्रेष्ठ चिकित्सक होय.

वृक्षायुर्वेद

वनस्पतिशास्त्राविषयी लिहिताना वृक्षायुर्वेदाविषयी लिहिणे अपरिहार्य आहे. मनुष्य आणि प्राणी यांच्याप्रमाणेच वृक्षांसाठी एक स्वतंत्र आयुर्वेदाचा भाग आहे. त्यास वृक्षायुर्वेद म्हणतात. पूर्वी लोकसंख्या कमी, वने, उपवने आणि अरण्ये मोठी असत. शहरांभोवती वा लहान गावांभोवती वनस्पतिंची विपुल उपलब्धता होती. वनस्पतिंची ओळख आणि उपयोगाचे सामान्यज्ञान घरातील थोर व्यक्तिंना असे. पर्णकुटयांपासून राजवाडयापर्यंत उद्याने लावली जात व जोपासली जात असत. वृक्षायुर्वेदाबाबत – तरूण वय, सुडौल शरीर असलेल्या गुणी, कलानिपुण, मधुर– प्रियभाषी स्त्रिया व तसा मित्रपरिवार, भरपूर धनदौलत असणाऱ्या व्यक्तिंना (सरदार वा राजेरजवाडे यांना) विहारासाठी जर उद्यान नसेल तर ती व्यक्ती किंवा राजा काय किंमतीचा ? असे उद्यान किंवा चांगला बगीचा असण्याचे दृष्टीने वरील विधान आहे. आणखी एक वचन असे आहे की,

बहुभिर्बत किं जातैः पुत्रैः धर्मार्थवर्जितैः ।

वरमेकः पथि तरूः यत्र विश्रम्यते जनाः ।।

ज्यांना धर्मार्थ कळत नाही (कर्तव्याची चाड नाही) अशा बऱ्याच मुलांना जन्म देण्यापेक्षा रस्त्यावर छायेने विश्रांती देणारे एक झाड लावणे, वाढवणे चांगले. आणखीही बरीच वचने सदर ग्रंथात आहेत ती त्या काळाला शोभेशी आहेत. अशा प्रकारे आरोग्यदृष्टया महत्वाच्या वृक्षांचा त्यात उल्लेख आहे. याशिवाय आरोग्याचे दृष्टीने घराभोवती कोणत्या दिशेला कोणते वृक्ष असावे अशी माहिती थोडक्यात आहे. घराच्या दारात सावली येईल इतका जवळ कोणताही वृक्ष प्रायः लावू नये. अशी सूचना लागवडीबद्दल केलेली आहे. वनस्पती बीजोद्भव, कांडोद्भव, कंदोद्भव असतात. बी त्वरित

उगविण्याचे उपाय दिलेले आहेत. योग्य दिवस, काळ, नक्षत्र पाहून वनस्पती लावाव्या, त्यांचे मांडव, गोलाकार, स्वस्तिकाकार, चौकोनी, चक्रव्यूह, सरळरेषेत, जाळयाकरून, अशी निरनिराळी रचना करून शोभा करावी. झाडांना खते, पाणी कसे किती द्यावे याविषयी संदर्भ असून माणसांप्रमाणेच झाडांनाही काही विकार होतात. उदा. वातज्वर झाडाला झालेल्या आघातावर मलमपट्टी करणे व विशेष प्रसंगी झाडांची शस्त्रकर्मेही त्यात वर्णिली आहेत. यावरून पूर्वाचार्यांचा अभ्यास व त्यांना वनस्पतींचे महत्व किती वाटत होते याची कल्पना येईल.

औद्योगिक क्रांती होत असता अनेक झाडांची तोड होते. दूर्वा, नागरमोथा, तालिमखाना अशी काही झाडे, वनस्पती, वीड [Weed] म्हणजे निरूपयोगी क्षुद्र वनस्पती तण म्हणून काढून टाकण्यात येते. वृक्ष वाचवा. जंगले वाचवा इ. मोहिमा राबवण्याचा प्रयत्न शासन करते. पण औषधी वनस्पतीचे दृष्टीने त्याकडे पुरेसे लक्ष दिले जाते का ? हे समजणे मात्र कठीण आहे. औषधी द्रव्ये म्हणून काही वनस्पतींचे वर्गीकरण करण्यात आले असले तरी, 'सर्व वनस्पती हया औषध आहेत. औषध नाही असे एकही द्रव्य जगात नाही ' असे आयुर्वेदात स्पष्ट सांगितले आहे. अनेक द्रव्यांची माहिती नाही आणि म्हणून ती द्रव्ये औषधात वापरली जात नाहीत. खेडयातील लोकांना, जंगलात राहणाऱ्या वा कारणानिमित्त हिंडणाऱ्या वनचरांना, वैदू लोकांना, पर्वतांवर व जंगलातील यती लोकांना त्यापैकी बऱ्याच माहिती आहेत. काविळीला ॲलोपॅथीत औषध नाही. आयुर्वेदिक औषधाने हा विकार लवकर बरा होतो. पित्ताशयातील खडयामुळे होणारी कावीळ प्रायःशस्त्रकर्माने बरी होते. कॅन्सरमुळे झालेली कावीळ असाध्य ठरते म्हणून औषधोपचारासाठी रोग निदान (रोगाचे कारण) महत्वाचे असते.

शरीर आणि वनस्पती

आपल्या शरीराप्रमाणेच वनस्पती ही जीवसृष्टी आहे, आपल्या शरीराला जशा सुखदुःखात्मक भावना आहेत तशाच वनस्पतींनाही भावना असतात हा विचार औषधासाठी वनस्पती तोडतांना करावयास हवा. वनस्पतींचा उपयोग करण्यापूर्वी करावयाचा पहिला विचार असा असावा की, पाने तोडतांना, साल काढताना किंवा वनस्पतीचे कोणतेही अंग तोडताना वनस्पतींना इजा किंवा फारशी वेदना होणार नाही. म्हणून पाने ओरबाडून ओढून काढू नयेत. जरूर तितकीच पाने, फुले, फळे, साल चटकन कात्रीने किंवा तीक्ष्ण चाकू सुरीने कापून घ्यावीत. झाड तसेच जिवंत रहावे म्हणून मूळ काढतांना एक चतुर्थांश भागापेक्षा अधिक मुळे तोडू नयेत. सालसुध्दा एकावेळी एक तृतीयांशपेक्षा जास्त काढू नये. शक्य असेल तेथे झाडांचा वरचा आणि टोकाकडचा भाग प्रथम घ्यावा. मूळ बुंध्याला धक्का लावू नये, फळे शक्यतो पक्की घ्यावीत. कच्ची फळे विनाकरण तोडू किंवा पाडू नयेत. झाडांचे कोणतेही अंग उपयोगासाठी घेण्यापूर्वी झाडाला आदरपूर्वक, प्रार्थनापूर्वक नमस्कार करून विनंती करावी की, 'रोगनिवारण या कामासाठी मी तुझ्या पानांचा, फुलांचा, सालीचा उपयोग करीत आहे. तू कृपा करून तुझे सर्वगुण त्यात राहू दे '. पूर्वीचे ग्रंथात तर असे सांगितले आहे की, आदले दिवशी झाडाचे मुळाजवळ तांदळाचे चार दाणे ठेवून वरीलप्रमाणे विनंती (निमंत्रण) झाडांना करावी आणि दुसरे दिवशी झाडाचे आवश्यक ते अंग काढून घ्यावे. या कामी कित्येक वेळी मुहूर्त पाहण्याचीसुध्दा पध्दती होती. दक्षिणेकडील पानांचे भाग टाळले जात इ. गोष्टींचा विचार आजच्या युगाात काहीसा वेडेपणा वाटण्याची शक्यता आहे. पण वनस्पती ही जीवसृष्टी आहे. त्यांना सुखदुःख इ. भावना आहेत. या पार्श्वभूमीवर औषधी संकलनाचा विचार असावा. कित्येक तज्ज्ञांनी झाडांना विविध प्रकारचे संगीत ऐकवून त्यांचे अनुकूल वा प्रतिकूल परिणाम झाडावर झाल्यांचे अनुभव नोंदविलेले आहेत. शांत

(शीत), गंभीर रागांचे अनुकूल व तीव्र स्वरांचे, रागांचे प्रतिकूल परिणाम होतात असे आम्ही स्वतः प्रयोगस्थळी पाहिले आहे.

वनस्पतीविषयी आपले प्रेम वर्धिष्णु असावे – आपण लहान असताना काही गोष्टी ऐकल्या वा वाचल्या असतील. हरवलेला राजपुत्र किंवा राजकन्या यांचे शोधासाठी त्यांचा भाऊ जंगलात किंवा अन्य गूढस्थानी जातो. जातांना तो आपल्या आई – वडिलांना सांगतो की, आपण काळजी करु नका, मजवर संकट आले तर आपल्या दाराशी लावलेल्या या झाडाचे फूल त्वरित कोमेजेल किंवा गळून पडेल असेच काही. ही कथा तशी खोटी नाही असे आजच्या शास्त्रीय युगातही शास्त्राचे सूक्ष्म प्रयोग करणाऱ्या शास्त्रज्ञांचे मत आहे. वनस्पती आणि प्राणी यांना असलेल्या अतीद्रिय शक्तीने, विशिष्ट कंपनांमुळे त्यांना संकटाचे ज्ञान अगोदर होते. ' सिक्रेट लाइफ ऑफ प्लॉन्टस् ' या पुस्तकांतून अशा प्रकारचे काही प्रायोगिक निष्कर्ष नोंदविले गेले आहेत. म्हणूनच पूर्वी उल्लेखलेली तुकारामांची उक्ति 'वृक्ष वल्ली आम्हा सोयरी वनचरे ' ही सार्थ वाटते.

उद्योग–व्यवसाय – शहरांची वाढ झाली, उद्योगधंदे वाढीस लागले आणि वनस्पती घरापासून दूर म्हणजे अधिक दूर गेल्या. एखाद्या व्यक्तीस 'अडुळशाच्या रसातून किंवा तुळशीच्या रसातून औषध घ्या. ' म्हटले तर अडुळसा वनस्पती जवळपास मिळत नाही. काही घरातून छोटी तुळशीची कुंडी असते त्यातून फार तर एक–दोन दिवस पुरेल इतका तुळशीचा रस मिळू शकतो किंवा मिळाली तर फुलवाल्यांकडे तुळस मिळू शेकते. ती आदले दिवसाची तोडलेली. ताजी वनस्पती शहरात दुर्मिळ होते. मग अडुळशाचे रसाऐवजी आडुळसा सरबत, वासावलेह. वसाका सायरप इत्यादी तयार औषधांनी गरज भागवावी लागते. घरातील आजीबाईचा बटवा, परसातील औषधे, देवाघरचा दवाखाना, घरातील औषधे अशी औषधी वनस्पतींची स्थाने व स्वरुपे नष्ट झाली. ती जागा औषधी कारखान्यांनी घेतली. महाराष्ट्रात जुने प्रसिध्द औषधी कारखाने म्हणजे – आयुर्वेद रसशाळा, पुणे; आयुर्वेद अर्कशाळा, सातारा, श्री. धूतपापेश्वर औषधी कारखाना, पनवेल ; चेंबूर येथील साण्डू ब्रदर्स, मुंबई येथील झंडू फार्मास्यूटिकल्स, कोल्हापूर येथील आर्यौषधी कारखाना, नागपूर येथील वैद्यनाथ भवन, नगर येथील श्री. गुणे यांचा औषधी कारखाना इत्यादींचा उल्लेख करता येईल. त्यानंतरच्या काळात, नासिक येथील आयुर्वेद सेवा संघाचे औषधी भवन, भुसावळ येथील नवशक्ति आयुर्वेदालय, सोलापूर येथील रसशाळा, हिमालय ड्रग कंपनी अलर्सिन, नागार्जुन, नांदेड येथे शासनाचेद्वारा औषधी तयार करण्यासाठी स्वतंत्र फार्मसी असून त्यात औषधी परीक्षण आणि प्रमाणीकरण करण्याचे कार्यही चालू आहे. गेल्या २०–२५ वर्षांतील अनेक नवीन कारखान्यांची निर्मिती झाली असून सुमारे ७ हजार कारखाने भारतात असावेत. न नोंदवलेले वा आपल्यापुरती औषधे तयार करणारी मंडळीही अनेक आहेत. आयुर्वेदीय औषधांचे म्हणजे वानस्पतिक औषधांची व वनस्पतींची मागणी परदेशातही वाढीस लागली असून मोठया प्रमाणात निर्यात होत आहे. वनस्पतींची औषधे परदेशात व देशात श्री. महेश योगी यांचे वैदिक विश्व विद्यापीठातून निर्माण आणि वितरणसुध्दा बऱ्याच प्रमाणात आहे. वनस्पतींचा अनपायी औषधोपयोग व वनस्पतीचा आहारातील उपयोग आणि दैनिक व्यवहारातील उदा. केसांसाठी उपयोगी तेले, शरीर स्वच्छतेसाठी साबण, केसातील स्वच्छतेसाठी (केस धुण्यासाठी) शाम्पु, दातांची स्वच्छता आणि दांत–हिरडयांचे विकारात उपयोगी म्हणून टूथ पावडर्स आणि पेस्ट, सफाईसाठी जंतुनाशके इ. सौंदर्य प्रसाधनांसाठी अन्य कल्पही बाजारात 'हर्बल' या शब्दाने हल्ली रुढ आहेत. हर्बल हा परवलीचा शब्द असल्याप्रमाणे कोणकोणत्या ठिकाणी वापरुन व्यापार वा अर्थसाधना करता येईल याकडे कल वाढलेला आहे.

शेती व्यवसायाबरोबर किंवा स्वतंत्ररीत्या औषधी वनस्पतींचे उत्पादन करण्याचा प्रयत्नही बऱ्याच ठिकाणी सुरू झाला आहे. टाटा, बजाज सारखे मातब्बरही या व्यवसायाकडे आकृष्ट झालेले दिसत आहेत. मुंबई विद्यापीठाने कालिना येथील क्षेत्रात मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेल्या आयुर्वेद महाविद्यालयाचे सहकार्याने औषधी उद्यान तयार करण्याचे कार्य सुरु केले आहे. पुणे येथील कोथरूड भागात नेहरू वनस्पती उद्यान व संग्रहालय कार्यरत आहे. पुण्याजवळ भीमाशंकराचे जवळील क्षेत्रातही असा उपक्रम आहे. उत्तन येथील केशवसृष्टि परिसरातही औषधी वनस्पतींची निर्मिती होत आहे. काही कृषि विद्यापीठेही औषधी वनस्पतींची लागवड आणि संशोधन कार्यात भाग घेत आहेत. केंद्र शासनाने राणिखेत येथे या दृष्टीने मोठा प्रकल्प चालविला आहे. विविध आयुर्वेद महाविद्यालयांमधून वनस्पती उद्याने आकार घेत आहेत. काही शेतकरीही यात अलीकडे रस घेत आहेत. गुग्गुळ, अश्वगंधा, शतावरी, गुळवेल, कंटकारी, वरूण, आवळा, हळद, अनंतमूळ, बेल कुडा ब्राम्ही व मसाल्याचे पदार्थ वाढविण्याचा प्रयत्न होत आहे. त्यासाठी विविध पुस्तिकाही प्रसिध्द झाल्या आहेत व होत आहेत. वेल्थ ऑफ इंडिया ग्रंथाच्या डिस्कही बरीच माहिती देतात.

प्रत्येक भाषा त्या भाषेतील शब्द हे विशिष्ट भाव डोळयासमोर आणतात. त्यामुळे एखाद्या वनस्पतीचे इंग्रजी भाषेत उल्लेखित गुण मराठीत व्यक्त करणे संपूर्णतः बरोबर वाटेलच असे नसते. जसे कुष्ठ म्हटले म्हणजे महाकुष्ठ, लेप्रसी असे वाटते पण कुष्ठ हा शब्द त्वचा विकार या अर्थीही वापरला जातो. म्हणून कुष्ठ विकारात उपयोगी वनस्पती महारोग बरी करते असे नव्हे. वनस्पतींचे गुणधर्म लिहितांना शासकीय पारिभाषिक कोशाचा उपयोग केला गेला आहे.

वनस्पतींचे गुणधर्म वाचताना किंवा अनुभवताना काही ठिकाणी विरोधाभासात्मक लक्षणे आढळण्याची शक्यता असते. उदा. आंबा हे मळप्रवृत्ती साफ करणारे फळ आहे असे वाचल्यानंतर पुढे आंबा हे संग्राही द्रव्य आहे असे विधान आले तर आंब्याची साल किंवा आंब्याची कोय (बी) यांचे तुरट रसाने मल संग्राही कार्य होऊ शकते असा संदर्भ अभ्यासावयास हवा. यापुढे एकाच वनस्पतीचे औषधी गुणधर्म आणि मात्रा रोग्याच्या प्रकृतिप्रमाणे वा शरीरातील दोष विकारांमुळे तर तम भावाने कमीजास्त किंवा भिन्न क्रिया प्रतिक्रिया दाखवू शकतात. अष्टाइंग हृदय ग्रंथाची कोष्ठक्रूशे मृदुर्मध्यो या पहिल्याच अध्यायातील ९वे श्लोकावरील टीका समजून वाचली तर वरील विधान लक्षात येईल. इच्छाभेदी हे विरेचक औषध कफदोषात्म दोषी रुग्णालय वामक आणि पित्त दोषीय रूग्णात विरेचक कार्य करते.

वरील उल्लेखित विरेच औषधाची सामान्य मात्रा १०० ते २०० मि.ग्रॅ. पुरते. पण काही रूग्णांना विशेषतः मधुमेहासारखे काही विकार असतां (दुर्विरेच्य मेटी) ही मात्रा ५०० मि.ग्रॅ.पेक्षाही अधिक लागते. अर्थात दूष्य, देश, बल, काल, प्रकृती, वय, आहार किंवा सवयींची औषधे (सात्म्य) वय, अग्नि (भूक) रूग्णावस्था इत्यादीचा जितका सूक्ष्म विचार वैद्याला करता येईल तितके यश त्याला मिळू शकेल.

अनेक ठिकाणी आलेला शब्द वायुनाशी याचा संबंध पचनातून निर्माण होणारा वायू आज व्यवहारात म्हणतात तसा 'गॅस ' अर्थ होतो आणि सामान्य वर्णन करताना अमुक वनस्पती कफपित्त वाढविते आणि वात कमी करते किंवा अमुक वनस्पती वातनाशक आहे या विधानाचा अर्थ गॅस असा न समजता शरीर धारणेसाठी उपयोगी असलेले किंवा शरीरात विकार निर्माण करणारे दोषांतील वात दोष असा ध्यावयास हवा.

अनेक वनस्पतीचे गुणधर्म वर्णन करतांना पोषक शक्तिवर्धक असे शब्द वाचनात येतात व येतील. शरीराला पोषण देणारी द्रव्ये गोड, स्निग्ध,

पचण्याला जड असतात अथवा आंबट गोड किंवा किंचित खारटसर चवीची असतात आणि कडू, तुरट, तिखट रसांची द्रव्ये शरीराचे पोषण कमी करणारी वा शोषण करणारी असतात. यास काही द्रव्ये अपवाद असतात किंवा शरीरातील कफासारखा दोष आपल्या द्रवमधुर स्निग्ध पिच्छिल गुरू इ. गुणांनी शरीरात ढिलेपणा, परिणामी अशक्तपणा निर्माण करतो. अशावेळी कडू, तुरट, तिखट द्रव्ये त्या अवयवातील कफ जातीचे दोष द्रवपित्त जातीचे दोष कमी करून शरीराला शक्ती देऊ शकतात. अशा प्रकारची क्रिया आधुनिक वैद्यकीय तज्ञ बिटर टॉनिक शब्दाने व्यक्त करतात. या दृष्टीने प्रत्येक अवयवातील मूळ सुप्तशक्ति, स्वाभाविक अवस्थेतील शक्ति म्हणजे टोन व टोन वाढविणारी द्रव्ये म्हणजे टॉनिक. मी यासाठी स्वाभाविक क्रियाशक्ति असा शब्द प्रयोग अधिक पसंत करतो. एकाच वनस्पतीचे गुण लिहितांना 'ग्राही', 'संग्राही', व 'सर' असे शब्दप्रयोग आले असता ग्राही, संग्राही म्हणजे वनस्पतीचा किंवा अन्नाचा रस शोषण करण्याची क्रिया वाढते त्यामुळे मलावरोध होईलच असे नाही मल घट्ट होईल येवढेच.
सर म्हणजे वात (गॅस) मल प्रवर्तक यामुळे मल घट्ट झाला तरी अवरोध होणार नाही असे जाणावे तसेच सर सर शब्दाने जुलाब होईल असेही नाही.

मूळ प्रसिध्द झालेला 'बॉटनी पार्ट १ मेडिसिनल प्लॉंटस्' हा इंग्रजी ग्रंथ पायाभूत ग्रंथ असून त्याखेरीज या ग्रंथांचे लेखन होत असताना अनेक ग्रंथाचे अवलोकन करावे लागले. त्यात मुख्यतः डॉ. वा. गो. देसाई यांचा ' औषधी संग्रह ग्रंथ भाव प्रकाश' मूळ ग्रंथ आणि श्री. चुनेकर यांनी संकलित व टीकाटिप्पणी केलेला ' भाव प्रकाश', हा पायाभूत ग्रंथ आहे. एकूण दर्शनिका विभागाचे हे प्रकाशन सर्व स्तरात उपयुक्त ठरेल असे वाटते.